## प्रेस नोट तारीख २७.९.२०१७

आर्थिक गुन्हे शाखा,पुणे शहर

आर्थिक गुन्हे शाखा,पुणे कडे कोरेगाव पो.स्टे.गुरनं. ६२/२०१६ भादवि.कलम ४६५, ४६७, ४६८,४७०, ४७१, ४२०, १२०(ब), ३४ व महाराष्ट्र नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८२ तपासास आहे. सदर गुन्हयात फिर्यादी अशोक नहार रा.नाना पेठ पुणे यांनी न-हे आंबेगाव,पुणे येथील असलेल्या जागेवर सन २०१२ मध्ये ४० फ्लॅटची इमारत बांधली त्यातील २२ फ्लॅटची विक्री त्यांनी केली. उर्वरित १८ फ्लॅटची विक्री करणे बाकी असताना त्या बांधकामाचे मास्टर फाईलचा उपयोग यापुर्वी अटक केलेल्या आरोपींनी बनावट दस्त तयार करण्यासाठी केला व त्या आधारे उर्वरित १७ फ्लॅटची विक्री खरेदीखताद्वारे दुय्यम निंबधक हवेली क्र.१९ औंध पुणे या कार्यालयात यापुर्वी अटक केलेल्या आरोपींनी वेगवेगळया लोकांना केलेली आहे. सदरचे बनावट खरेदीखत नोंदविताना अशोक नहार या मुळ मालकाऐवजी आरोपी विशाल भाटीया ऊर्फ विशाल राजपुत रा.दिल्ली सध्या पुणे हा संबधीत दुय्यम निंबधक कार्यालयात हजर राहिला आहे. फ्लॅट खरेदी करणारे व विक्री करणारा बनावट अशोक नहार (खरे नाव विशाल राजपुत ऊर्फ विशाल भाटिया) यांना व्यक्तीशा ओळखतो म्हणून वकील नंदकुमार टाकळकर रा.कसबापेठ,पुणे यांनी दुय्यम निंबधक कार्यालयात स्वताची सही,अंगठे व फोटो दिलेले आहेत. श्री.टाकळकर यांनी बनावट अशोक नहार यास ओळख दाखविली असल्याने तसेच त्यांचा सहभाग असल्याने त्यांना या गुन्हयाचे कामी दि.२६.९.२०१७ रोजी अटक करण्यात आली असून तपासकामी पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आलेली आहे.

सदर गुन्हयाचा तपास मा.अपर पोलीस आयुक्त श्री.प्रदीप देशपांडे,मा.पोलीस उप आयुक्त श्री.सुधीर हिरेमठ व सहा.पोलीस आयुक्त श्री.मिलींद पाटील यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.चंद्रकांत ठाकूर हे करीत आहेत.